Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# कोविडमुळे कृषी क्षेत्रावर झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा अभ्यास

**अरुणा साहेबराव शिंदे**
संशोधक विध्यार्थिनी

**प्रस्तावना**

भारत हा कृषी प्रधान देश असून भारत विकासात अतिशय मागासलेला होता. तेव्हापासून आजपर्यंत देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहेत. या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती हाच आहे. पूर्वी ग्रामीण अर्थव्यवस्थेत खेडे हा घटक स्वयंपूर्ण होता. परंतु आधुनिक विकासाच्या प्रवाहात हे चित्र पालटलेले दिसते. खेड्यातील अनेक व्यवसायांचा ऱ्हास होऊ लागल्याने ग्रामीण भागातील श्रमशक्ती रोजगाराच्या शोधात शहरी भागाकडे स्थलांतर करू लागली. परंतू कोरोना महामारी त्या संकटावर मात करण्यासाठी सरकारने जाहीर केलेले लॉकडाउत्तमुळे शहरी भागातील श्रमशक्ती म्हणजेच कामगार परत आपल्या मूळ गावी, ग्रामीण भागात परत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शहरातील उद्योग, व्यापार, दळणवळण इ. सर्व क्षेत्र बंद असल्याने कामगारांना शहरी भागात जीवन जगणे कठीण झाल्याने ते परत ग्रामीण भागात आलेले आहेत.

कोरोनामुळे जगाच जनजीवन विस्कळीत झालेलं असताना जगाचा अन्नदाता मात्र हताश झालाय घाम गाळून उभं केलेलं पीक रानात नासून जातयं. म्हणूणच शेतकऱ्याला आधाराची गरजय, कोरोनानं जगभरातील प्रत्येकाला जेरीस आणलंय. व्यापारी घरात आहे. शिक्षक घरात आहे. उद्योजक आणि कामगारही घरात आहेत. कोरोनाचं अख्खांच्या अख्ख जग घरात कोंडून ठेवलय जणू पण, आपला शेतकरी मात्र राना वावरात राबतोय. माती उपसतोय.. घाम पेरतोय.. अन् मोती पिकवतोय, मात्र ही पिकवलेला माती रानातच राहतेय. कारण कोरोनानं बाजारपेठांना कुलूप लावलय. लोकांना घरातून बाहेर पडता येत नाही त्यामुळे शेतकऱ्यान काबाडकष्ट करून पिकवलेला जिन्नस घेणार कोण, हा मोठा प्रश्न उभा राहिलाय. जगातल्या पहिल्या व्यक्तीपासून ते शेवटच्या व्यक्तीपर्यंत प्रत्येकाची मुलभूत गरज अन्न हीच आहे. आणि अन्न केवळ आणि केवळ शेतीच देऊ शकते. म्हणून शेती टिकली पाहिजे, आणि त्यासाठी शेतकरी जगला पाहिजे, शहरी भागात कोरोना महामारी ज्याप्रमाणे परिणाम झाला. त्याच प्रमाणे ग्रामीण जीवनावर देखील कोरोना महामारी परिणाम झालेला दिसून येतो. कोरोना महामारीचा शहरी जीवन पूर्णतः स्तब्ध झाले होते. परंतू ग्रामीण जीवन थोड्याफार प्रमाणात तरी सुरळीत चालले होते. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महामारीचा शेतीवर झालेला अनूकूल तसेच प्रतिकूल स्वरुपाचा परिणाल झाला. ग्रामीण भागातील

शेतकऱ्यांच्या जीवनावर झालेला परिणाम त्यांच्या आरोग्यावरील परिणाम यांचा अभ्यास करणे या शोधनिबंधाचे मानस आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

०१) कोरोना महामारी शेतकऱ्यांवर झालेला परिणाम अभ्यासणे,

२) कोरोना काळात शेतकऱ्यांच्या जीवन शैलीचा अभ्यास करणे.

०३) कोरोना काळात कृषी क्षेत्राचा अभ्यास करणे

०४) लॉकडाऊन काळात शेतकरी वर्गावर येणारी आव्हाने व त्यावर उपाय शोधणे.

## संशोधन पध्दती

या संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे विविध संकेत स्थळे यांचा वापर केला आहे.

## विषय स्पष्टीकरण

### कोरोना महामारीमध्ये शेतकऱ्यांवरील अनुकूल परिणाम : -

कोरोना महामारीचा विचार केल्यास, कोरोना महामारीच्या वाईट परिणामामध्ये काही आशेचे किरण सुध्दा शेतकऱ्यांच्या जीवनात दिसत आहेत. कोरोना महामारीमुळे शेतकऱ्यांच्या मनात आपण जगाचे पोशिंदे आहोत व आपल्यामुळे १४० कोटी जनता घरात राहुन सुध्दा आनंदाने आपले पोट भरत आहे ही सकारात्मक भावना दिसू लागली आहे. श्री रमेश चंद म्हणाले की, अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम शेती क्षेत्रावर होणार नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचा हिस्सा १६ टक्के आहे. आणि देशातील जवळपास ६० टक्के आर्थिक व्यवहार बंद असतानाही शेती क्षेत्रातील कामे अपवाद वगळता चांगल्या प्रकारे सुरू आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात कृषी आणि संलग्न क्षेत्रातील विकास दर हा ३.७ टक्क्यांवर होता. आपण सध्याच्या किंमत पातळीवर विचार केल्यास, हा ११.३ टक्क्यांवर असून शेतीव्यतिरिक्त क्षेत्रातील विकास दरापेक्षा ६० टक्के अधिक आहे.

लॉकडाऊनमुळे झालेल्या कामगारांच्या स्थलांतराने ग्रामीण भागात मजुरांची संख्या वाढली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शेती आणि पूरक व्यवसाय विकसित होण्यास मदत होत आहे. शेती हे फक्त उपजीविकेचे साधन नसून एक उद्योग म्हणून शेतीकडे पाहिले जात आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात नवीन संशोधनाला वाव मिळत आहे. लघु, कुटीर, मध्यम उद्योग तसेच सहकारी उद्योग यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी कामगार वर्ग प्रयत्नशील आहेत. त्यामुळे खेडी स्वयंपूर्ण होण्यास मदत झालेली आहे.

**कोरोना महामारीमध्ये शेतकऱ्यांच्या जीवनावरील प्रतिकूल परिणाम :-**

खरीप रब्बी हंगामातील कापूस, तूर, गहू सोयाबीन सारखे पीक बाजार बंद असल्यामुळे घरातच पडून आहे. शेती पूरक व्यवसाय करणारे शेतकरी व कामगार जसे भाजीपाला, दुग्धव्यवसाय, फळशेती करणाऱ्यांचे अतोनात हाल होत आहे. लॉकडाऊनमुळे बऱ्याचदा शहरात भाजीपाला, फळे, विकण्यास अडवले जात असल्यामुळे व खेड्यात तेवडी मागणी नसल्यामुळे एक तर भाजीपाला फळे ही नाशवंत पिके खराब होत आहेत किंवा कवडी मोल भावाने विकावे लागली होती. उन्हाळी पिके जसे भुईमूग, तीळ घेता आले नाही. फुलशेतीचा विचार केल्यास लग्न सराई तसेच सार्वजनिक कार्यक्रमावर कोरोनामुळे बंदी असल्याने व फुलांची मागणी ही कमी या झाल्यामुळे फुल उत्पादक शेतकरी चिंतेत होते.

खरीप पिकासाठी जी सप्लाय चैन लागते जसे बो बियाणे खते जंतूनाशके हयांचा कच्चा मालाचा तुटवडा असल्यामुळे खरीप हंगामावर याचा परिणाम होणार आहे, यातच बोगस बियाणेवाले माफिया हया परिस्थितीचा फायदा घेऊन बाजारात बोगस बियाणे विक्री करण्याच्या तयारीत दिसत आहेत. आठवडी बाजार बंद झाल्यामुळे खेडयात जीवनावश्यक वस्तृचा तुडवडा जाणवत आहे. एकीकडे बाजार बंद असल्यामुळे घरात माल पडून होता व नवीन कृषी कर्ज न मिळाल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला होता.

**लॉकडाऊन काळात शेतकरी वर्गावर येणारी आव्हाने :-**

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट या सदरात मोडणारी आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी म्हणूण वाढत्या प्रमाणात कर्जबाजारी पणा आणि या दुष्टचक्राचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या अशी स्थिती दोन दशक पेक्षा जास्त काळ राहिलेली दिसते.

०१. शेतातील पिकांचा खप होत नसल्याने आर्थिक संकट त्यांच्यावर ओढवत आहे.

०२. कृषी बाजारपेठेत योग्य दर त्यांना मिळत नाही त्यामुळे ते हवालदिल झालेले आहेत.

०३. आलेल्या पिकांचे नुकसान सोसावे लागत आहे.

०४. मार्नासकता ढासाळत आहे

०५. नापिकीचा भत्ता शासन देऊ करत आहे पण हे सर्व कागदोपत्रीच आहे.

०६. शेत माल विकण्या करता वाहतुकीच्या अडचणी

०७. शेत माल विकताना ग्राहकांची कमतरता

०८. ग्राहकांकडून मागणीचा अभाव

०९. योग्य दर मिळत नाही

## निष्कर्ष

कोरोना महामारीच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास संभाव्य धोका टाळण्यासाठी शेती क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रातही सुधारणा होणे अपेक्षित आहे. जसे आरोग्य, रोजगार, शिक्षण क्षेत्र याचाही विचार होणे गरजेचे आहे. मजुरांचा प्रश्न ऐरणीचा असल्याने ग्रामीण भागातून शहीरी भागात स्थलांतर थांबविणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागातील मजुरांना जर ग्रामीण भागातच बारमाही रोजगार उपलब्ध झाला तर संभाव्य स्थलांतर टाळता येईल, त्यासाठी ग्रामीण भाग स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहेत. ग्रामीण भागात लघु उद्योग, कुटिर उद्योग मध्यम व सहकारी उद्योग त्याचप्रमाणे शेतीपूरक व्यवसाय त्यांची नव्याने निर्मिती करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था सक्षम होऊन शेती व ग्रामीण जीवनात आमूलाग्र परिवर्तन होईल. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन असून बहुसंख्य जनतेला रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग आहे. म्हणून शेतीकडे उद्योग म्हणून पाहणे काळाची गरज आहे. उद्योगास असलेल्या सोयी सुविधा, सवलती, स्वातंत्र्य हे शेती क्षेत्रालाही मिळायला हवेत, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वात जास्त वाताहात ही मजूर वर्गाची झालेली दिसते आणि हा मजूर वर्ग ग्रामीण भागातील शेतकरी आहेत.

## संदर्भ ग्रंथ

०१) www.go indiaagriculture.com

०२) महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०२०-२१

०३) चंद डॉ रमेश अर्थव्यवस्थेला शेती तारणार ॲग्रोवन ई पेपर ०६ मे २०२०

०४) श्रीकांत पोहनकर कोरान कृषी शेती सामना ई पेपर २७ जानेवारी २०२०

०५) रमेश पालवे शेती शेतकरी आणि अर्थकारण द युनिक अकॅडमी पुणे

०६) http:mr.wikipedia.org

०७) भारताची अर्थव्यवस्था https: cikipedia.org Economyofindia

०८) भारतीय कृषी अर्थव्यवस्था रंजन कोळंबे

९) देसाई भालेराव (२०००) “कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय ” निराली प्रकाशन पुणे

10) प्रा. राम देशमुख (२००५) “मुलभूत सांखिक ”, विद्या प्रकाशन, रुईकर मार्ग , नागपूर